अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार
राज्यातील खाजगी संस्थांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे
नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय :- क्र.टिईएम-२००७/(२८४ /०७)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० जून, २००७ .

संदर्भ:- संदर्भ:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली यांची ची पत्र-
१) क्र. ०६/०७/MS/MBA/२००७/००७ III दिनांक २९ जून, २००७
२) क्र. ०६/०१/MS/MBA/२००७/००७ /LOA VII दिनांक २८ जून, २००७
३) क्र. ०६/०७/MS/ MBA /२००६/००१-III दिनांक २८ जून, २००७
४) क्र. ०६/०७/MS/MBA/२००७/००७ III दिनांक २९ जून, २००७
५) क्र. ०६/०७/MS/MCA/२००७/००७ III दिनांक २९ जून, २००७

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील संस्थांना शैक्षणिक व २००७-२००८ करिता एम.बी.ए / एम.सी.ए. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | सुधारित प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | कासेगांव एज्यूकेशन सोसायटीचे राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, आबेगाव हवेली, पुणे | एम. बी.ए. | ६० |
| २ | एव्हरेस्ट एज्यूकेशन सोसायटीचे डॉ. आझका कादरी इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲण्ड रिसर्च, गट नं.१८९, ओहरगांव, औरंगाबाद | एम. बी.ए. | ६० |
| ३ | राजमाता जीजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे इन्स्टिटयुट ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड मॅनेजमेंट रिसर्च, गट नं.१०१-१०२ मोशी आळंदी रोड, दुधळ गाव, पुणे. | एम.बी.ए. | ६० |
| ४ | जी.एच.रायसोनी एज्यूकेशनल ॲण्ड मेडीकल फौन्डेशनचे जी.एच.रायसोनी इन्स्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च,१२०० नविन वाघोली,ता.हवेली, जि. पुणे | एम.बी.ए. | ६० |
| ५ | जी.एच.रायसोनी एज्यूकेशन सोसायटीचे जी.एच.रायसोनी इन्स्टीटयूट ऑफ इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, पाचोरा रोड, मोहाडी जळगांव | एम.सी.ए. | ६० |

या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००७-२००८

कृ.मा.

पासून एम.बी.ए / एम. सी.ए. या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बार्बीची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे,औरंगाबाद,नाशिक
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे,
कुलसचिव,.डा.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद.
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.